25-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 6/24/2025 11:36 PM Page 1



# नावेली मध्ये सरपंचपद रिक्त, विकास योजनांना ब्रेक

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २४ :** नावेलि ग्रामपंचायतीत सरपंच मिंगेल कार्डोझो यांच्या राजीनाम्यानंतर तब्बल तीन आठवड्यांहून अधिक काळ लोटूनही नव्या सरपंचाची निवड न झाल्यामुळे पंचायतीचे प्रशासन ठप्प झाले असून विकासकामे रखडली आहेत. ग्रामसभा आयोजित करण्यात होणारा विलंब, निर्णय प्रक्रियेत अडथळे आणि नागरी तक्रारींच्या समाधानास विलंब यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

२२ दिवसांपूर्वी कार्डोझो यांनी पदत्याग करताना उपसरपंच वेलिंडा डायस यांच्याकडे हंगामी जबाबदारी सोपवली होती. मात्र, बीडीओ कार्यालयाकडून अद्यापही विशेष सभेचे आदेश न मिळाल्यामुळे नव्या सरपंचाची निवड होऊ शकलेली नाही. त्यामुळे पंचायत प्रशासन अक्षरशः ठप्प झाले आहे.

पंचायतीच्या सूत्रांनी सांगितले की, पूर्णवेळ सरपंच नसल्यामुळे निर्णय घेणे, ठराव संमत करणे, आणि प्रस्ताव मान्य करणे या महत्त्वाच्या प्रक्रिया रखडल्या आहेत. परिणामी, नागरिकांनी सादर केलेले अनेक अर्ज आणि विकास प्रस्ताव अजूनही विचाराधीन अवस्थेत आहेत.

एप्रिल आणि जून महिन्यात ग्रामसभा घेणे कायद्याने बंधनकारक असतानाही, नावेली पंचायत त्या घेण्यात अपयशी ठरली आहे. यामुळे पायाभूत सुविधा, रस्ते दुरुस्ती, कचरा व्यवस्थापन, आणि इतर कल्याणकारी उपक्रम ठप्प झाले आहेत.

स्थानिक रहिवासी फ्रँकी पायरेस यांनी नाराजी व्यक्त करत सांगितले की, आम्ही रोजच्या अडचणींनी त्रस्त आहोत. सरपंच कोण हे महत्त्वाचे नसून, प्रशासन कार्यरत असणे गरजेचे आहे. साधे रस्ते किंवा कचरा उचलणेही वेळेवर होत नाही.

मायकेल अल्वारेस या दुसऱ्या गावकऱ्यानेही अशीच भावना व्यक्त करत सांगितले, आता २० दिवसांपेक्षा जास्त वेळ गेला. ग्रामसभा घेतल्या नाहीत. कोणतीही कृती दिसत नाही. अधिकारी आणि बीडीओ कार्यालयाने तत्काळ बैठक घेऊन सरपंचाची निवड करावी आणि ग्रामसभा बोलवावी.

या संपूर्ण प्रक्रियेतील विलंबामुळे गोवा पंचायत राज कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असून स्थानिक स्वराज्य संस्थांची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हा फक्त कायद्याचा मुद्दा नाही, तर त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांचा आहे.

ग्रामस्थ, पंचायत सदस्य आणि स्थानिक प्रतिनिधी आता एकवटून बीडीओ कार्यालयाकडे निवडणूक प्रक्रिया जलद करण्याची मागणी करत आहेत. त्याशिवाय प्रशासकीय ठप्पपणाचे चक्र अखंड सुरू राहील, आणि नावेली मधील गतीमान विकास केवळ घोषणांपुरता मर्यादित राहील, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-II AT PONDA-GOA**
Case No: JM/TNC/B1/Shiroda/3/2023
1. Smt. Laxmi Roulu Naik Shirodkar
2. Mr. Phalgun Roulu Naik Shirodkar
3. Mr. Umesh alias Bapu Roulu Naik Shirodkar
All r/o H. No. 120, Near Khutadevi Mandir, Gadder, Taravalem, Shiroda, Ponda -Goa.
4. Miss Chandani Roulu Naik Shirodkar r/o Gharbhat, Vazem, Shiroda-Ponda-Goa and presently residing at Taravalem, Shiroda, Ponda -Goa.
5. Mrs. Diksha Pravin Desai r/o Dalem, Shetkarwada, Canacona - Goa
6. Mrs. Deepa Shivdas Fadte r/o Varra, Sanvordem-Goa
7. Mrs. Rupa Yushudas Pillai r/o Gharbhat, Vazem, Shiroda, Ponda-Goa
.....Applicants
V/S
1. Francisco Figueiredo (Since Deceased) Through his legal heirs
a) Mrs. Maria Jose De Fatima Filomeno de Figueiredo
b) Mr. Alberto Agostinho de Jesus Coalco Both r/o H. No. 151-A, Behind Holy Spirit Nursing Home, Margao Salcete- Goa.
2 Mrs. Ethel Mary Filomena Agnela Fernandes
3 Mr. Antonio Savio Filomeno De Fernandes
4 Miss. Natalia Maria Filomeno de Figueiredo
5 Mr. Francisco Filomeno de Figueiredo
6 Mr. Bruno Filomeno de Figueiredo All r/o H. No. 1454, Varde Valaulikar road, Margao-Salcete-Goa
7. Mrs. Indira do Carmo Fernandes e Figueiredo
8. Mrs. Tania Maria Filomena de Figueiredo
9. Mr. J Sachdev All r/o H. No. 151-A,, Behind Holy Spirit Nursing Home, Margao- Salcete-Goa.
..... Opponents
**NOTICE**
To,
The Respondents
Whereas, the above named applicant has filed an application dated 27/02/2025 in this Court u/s 7 of the Goa Daman & Diu Agricultural Tenancy Act, 1964 for application for amendment.
Therefore, you are hereby directed to remain present in this Court on **09/06/2025 at 3.00 p.m** to give you say on the application filed by the applicant.
Take notice that in default of your appearance on the aforesaid date, time ar place mentioned herein above, the application will be heard and determined in your absence.
Given under my hand and the seal of the Court, dated 16th day of April, 2025.
By R. P. A. D.
Sd/-
**(Rosario Carvalho)**
Jt. Mamlatdar - II of Ponda, Ponda Goa.
SEAL

**CHANGE IN NAME**
I **CONCIO SOUSA** R/O 92/A, ANUZ, NUVEM, SALCETE, GOA like to change my name from **CONCIO D SOUZA** to **CONCIO SOUSA**. Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **CONCIO SOUSA**.

**CHANGE OF NAME**
I, **RITA REBELLO**, resident of H. NO. 2/11, Naikawaddo, near St. Ana building , Calangute- Goa. 403516, would like to change my name from **RITA PINTO** to **RITA REBELLO**. Henceforth for all my dealings, documentation, Passport, I will be known as **RITA REBELLO**.

**CHANGE OF NAME**
I, **Khatija bi**, Resident of H. no. 10, New Wada Sarvan, Bicholim-North Goa, India hereby change my name from **Khatija bi Ilyas Syed** to **khatija bi** . Hereafter in all my dealings and documents, my name will be known by **khatija bi** .

# युद्धनौका तामाल' नौदलात दाखल होणार




**नवी दिल्ली, दि. २४ :**

रशियाच्या कॅलिनिनग्रांड येथे १ जुलै २०२५ रोजी आयोजित समारंभात तमाल युद्धनौका भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी भारतीय नौदलाच्या पश्चिम नौदल कमांडचे प्रमुख फ्लॅग ऑफिसर कमांडिंग–इन–चीफ व्हाइस ऍडमिरल संजय जे. सिंग तसेच भारत आणि रशियाचे अनेक उच्चस्तरीय अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

तामाल' असे नामकरण करण्यात आलेली ही फ्रिगेट, गेल्या २ दशकांमध्ये रशियाकडून भारतीय नौदलात समाविष्ट करण्यात आलेल्या क्रिव्हाक श्रेणीतील आठवी युद्धनौका आहे. तामाल' ही तुशिल श्रेणीतील दुसरी नौका आहे, जी आधीच्या तलवार आणि तेंग श्रेणीतील नौकांची सुधारित आवृत्ती आहे. तलवार व तेंग या प्रत्येकी तीन–तीन नौकांच्या श्रेण्या होत्या. या व्यापक कराराअंतर्गत, भारतात गोवा शिपयार्ड लिमिटेडमध्ये तंत्रज्ञान हस्तांतरण व रशियन डिझाईन मदतीसह त्रिपुट' श्रेणीच्या दोन फ्रिगेट्सही बांधल्या जात आहेत. या नौकांच्या मालिकेच्या समाप्तीपर्यंत भारतीय नौदलाकडे एकसमान क्षमतांशी सुसंगत अशा चार वेगवेगळ्या श्रेणींमध्ये एकूण दहा युद्धनौका असतील, ज्यात उपकरणे, शस्त्रास्त्र व सेन्सर प्रणालींची समानता असेल.

तामाल'च्या बांधकामावर भारतीय युद्धनौका देखरेख पथकातील तज्ज्ञांच्या पथकाने निरीक्षण केलं असून, हे पथक भारतीय दूतावास, मॉस्कोच्या अधिपत्याखाली कॅलिनिनग्राड येथे कार्यरत होते. नौदल मुख्यालयात, युद्धनौका उत्पादन आणि अधिग्रहण नियंत्रकांच्या अंतर्गत जहाज उत्पादन संचालनालयाने या प्रकल्पाचे नेतृत्व केले.

तामाल'ची निर्मिती रशियाच्या कॅलिनिनग्राड येथील यांतर शिपयार्डमध्ये करण्यात आली असून, आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया उपक्रमांच्या अनुषंगाने परदेशातून प्राप्त होणारी ही शेवटची युद्धनौका ठरणार आहे. या जहाजामध्ये २६ टक्के स्वदेशी घटकांचा समावेश आहे, ज्यात समुद्रावर व जमिनीवर लक्ष्यभेद करणारे ब्रह्मोस लांब पल्ल्याचे क्रूझ क्षेपणास्त्रही आहे. या जहाजात आपल्या पूर्ववर्तीशी तुलना करता लक्षणीय सुधारणा करण्यात आल्या असून, उभ्या प्रक्षेपण पद्धतीच्या पृष्ठभाग ते हवाई क्षेपणास्त्र प्रणाली, सुधारित १०० मिमी तोफ, सुधारित इलेक्ट्रो–ऑप्टिकल/इन्फ्रारेड प्रणाली, ३० मिमी क्लोज–इन वेपन सिस्टम, जड टॉरपीडोज, त्वरित हल्ला–विरोधी पाणबुडी रॉकेट्स आणि अनेक पाळत ठेवणाकी आणि अग्नि नियंत्रण रडार प्रणाली यांचा समावेश आहे. लढाऊ क्षमतांमध्ये वृद्धी साधण्यासाठी, हवाई प्रारंभिक इशारा व बहुउद्देशीय भूमिका पार पाडणारी हेलिकॉप्टर्स या जहाजावरून तैनात करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तामाल'च्या लढाऊ क्षमतेमध्ये नेटवर्क–सेंट्रिक युद्ध प्रणाली आणि अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणालींचा अंतर्भाव आहे.. अधिक वजन आणि अधिक मारक क्षमतेच्या गुणोत्तरासह, दीर्घकालीन गस्त क्षमतेसह आणि ३० नॉट्सहून अधिक गती क्षमतेसह तामाल' आपले सामर्थ्य सिध्द करते.या नौकेवरील सुमारे २५० नौसैनिकांनी सेंट पीटर्सबर्ग व कॅलिनिनग्राड येथील अत्यंत कठीण हिवाळी परिस्थितीत जमिनीवर व समुद्रावर कठोर प्रशिक्षण घेतले आहे. तामाल'ने तीन महिन्यांच्या कालावधीत विस्तृत समुद्री चाचण्या पूर्ण केल्या असून, त्याच्या सर्व प्रणाली, शस्त्रास्त्रे व सेन्सर्स कार्यक्षम असल्याचे सिध्द झाले आहे.

पान १ वरून

## कर्माच्या फळांचा हिशेब सुरू झाला आहे – ढवळीकर

आज नियतीने त्यांना त्यांच्या कृतीचे फळ दिले आहे, अशी टीका त्यांनी केली.

भविष्यात मुख्यमंत्रिपदाच्या शक्यतेबाबत विचारले असता, ढवळीकर यांनी नेहमीच्या संयमित शैलीत उत्तर दिले, मी मुख्यमंत्री होणार की नाही हे माझ्या नशिबावर आणि जनतेच्या कृपेवर अवलंबून आहे.

मगोच्या आगामी राजकीय वाटचालीबाबत विधान करताना ढवळीकर म्हणाले की, मगो पक्ष हा केवळ प्रियोळपुरता मर्यादित नसून, संपूर्ण गोव्यात आमचे कार्य सुरू आहे. त्यांनी यावेळी दाबोळी मतदारसंघाचे उदाहरण देत सांगितले की, तेथे आम्हाला पाच हजार मते मिळाली होती. यापुढे प्रियोळसह सर्वच मतदारसंघांत पक्ष सक्रिय राहील.

ढवळीकर यांनी या वक्तव्यातून प्रियोळ मतदारसंघातील आगामी राजकीय पुनर्रचनेसाठी संकेत दिल्याचे स्पष्ट होत आहे . गावडे यांचा प्रियोळ मतदारसंघावरचा वरचष्मा आणि मगोचा पारंपरिक गड यामध्ये कोण कसा पाय रोवतो यावर आगामी विधानसभा निवडणुकीचे समीकरण ठरणार आहे.राजकीय वर्तुळात या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा मगो पक्षाच्या हालचालींवर लक्ष केंद्रीत झाले आहे. विशेषतः प्रियोळ मतदारसंघात सत्तासमीकरण कसे बदलते याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# बलराम उच्च माध्यमिक विद्यालयात योगदिन




अर्धफोंड–पैंगीण येथे योगासने करताना मार्गदर्शक संतोष गावकर, शारीरिक शिक्षक संदीप गावकर, शिक्षक विशांत गावकर, विद्यार्थी व अन्य.

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**आगोंद, दि. २४:** अर्धफोंड पैंगीण येथील बलराम उच्च माध्यमिक विद्यालयात योगदिन स्फुर्तीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी योग मार्गदर्शक म्हणून माजी विद्यार्थी कु. संतोष गावकर याची उपस्थिती लाभली होती.

कु. विद्या वेळीप हिने योग विषयी लेख वाचन केले. तसेच विद्यार्थ्यांनी कसरत आणि ध्यान करुन योग दिनाचे महत्व जाणून घेतले. या कार्यक्रमाचे आयोजन शारीरिक शिक्षक संदीप गावकर यांनी केले. प्रभारी शिक्षिका सौ. कविता गावकर हिने विद्द्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या हस्ते मार्गदर्शक संतोष गावकर यांना स्मृतीचिन्ह भेटविण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कु. आंचल तवडकर हिने केले.

# सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय साखळी येथे योग दिन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सांखळी दि. २४ :** सरकारी उच्च माध्यमिक विद्यालय सांखळी येथे विद्यालयाच्या राष्टीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण कक्ष यांच्यावतीने आंतरराष्टीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.योग प्रशिक्षक विद्या वेर्णेकर आणि सुनील गणपुले यांनी विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी योग सत्र घेतले.

दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी व्यासपीठावर पतंजली योग समितीचे योग प्रशिक्षक विद्या वेर्णेकर,सुनील गणपुले,विद्यालयाचे प्राचार्य श्रीकृष्ण नाईक,उपप्राचार्य लिना च्यारी,राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख कार्यक्रम अधिकारी समीर प्रभू,शारीरिक शिक्षक प्रमीद चावडीकर उपस्थित होते.




सांखळी येथील सरकारी उच्च माध्यमिक विद्यालयात योग दिनाचे उदघाटन करताना प्राचार्य श्रीकृष्ण नाईक,सोबत प्रशिक्षक विद्या वेर्णेकर,सुनील गणपुले तसेच लिना च्यारी,समीर प्रभू,प्रमीद चावडीकर

प्राचार्य श्रीकृष्ण नाईक यांनी स्वागत करून या वर्षाचा योग संकल्प तो म्हणजे 'एक योग एक पृथ्वी एक आरोग्य' बाबतीत मार्गदर्शन केले.समीर प्रभू यानी प्रशिक्षकांची ओळख केली.

या सत्राचा उद्देश शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे फायदे याबद्दल जागरूकता करणे आणि सहभागींमध्ये निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हा होता.विद्या वेर्णेकर यांनी योग दिनाचे महत्त्व सांगून सत्राची सुरुवात केली आणि सर्वांना वॉर्म–अप व्यायाम,मूलभूत आसने आणि प्राणायाम तंत्रांच्या मालिकेद्वारे मार्गदर्शन केले.

त्यानंतर सुनील गणपुले यांनी श्वासोच्छवासाचे व्यायाम,ध्यान आणि तणावमुक्ती आसनांवर मार्गदर्शन केले.त्यांनी एकाग्रता,लवचिकता आणि आंतरिक शांती सुधारण्यासाठी नियमित योग सरावाचे महत्त्व विशद केले.

या योग सत्रात ३१० हून अधिक विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांनी भाग घेतला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रशिक्षकांना प्राचार्याच्या हस्ते सन्मानपत्र देण्यात आली.सूत्रसंचालन एन.एस. एस. कार्यक्रम अधिकारी श्रद्धाली बेतकर यांनी केले तर उपप्राचार्य लीना च्यारी यांनी आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी नितीश नाईक आणि कर्मचारीवर्गाचे विशेष सहकार्य लाभले. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुंदर रांगोळी रेखाटुन कार्यक्रमाला शोभा आणली.

# योग आणि भगवत गीता यांचे जीवनात खूप महत्त्व : प्रकाश राजाध्यक्ष

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सांखळी दि. २४:** भगवत गीता आपल्याला जीवनातील कठीण प्रसंगांना कसे सामोरे जायचे आणि आपले कर्तव्य कसे पार पाडायचे याबद्दल मार्गदर्शन करते, तर योग आपल्याला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी राहण्यासाठी मदत करतो असे गौरवोउदगार भगवत गीता व संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक व तसेच सेझा गोवा आस्थापनाचे माजी व्यवस्थापक प्रकाश राजाध्यक्ष यांनी ११ व्या आंतरराष्टीय योग दिना निमित्त व्यक्त केले.

पंतजली योग समिती साखळी प्रभागाने रविंद्र भवन साखळीत आयोजित केलेल्या खास कार्यक्रमात प्रमुख पाहुणे ह्या नात्याने बोलत होते. ते पुढे म्हणाले, भगवत गीता आपल्याला जीवनातील अनेक प्रश्नांची उत्तरे आणि नैतिक संभ्रमांवर उपाय देते. भगवत गीतेमध्ये कर्मयोग आणि भक्ती योगावर जोर दिला आहे. जे आपल्याला परमात्म्याशी जोडण्यास मदत करतात. योग आपल्याला आत्म–



साक्षात्कार,शांतीचा मार्ग आणि मनावर ताबा मिळवण्यासाठी मदत करतो. पूर्वीच्याकाळी योग हा फक्त माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी सिमीत होता. कालांतराने मग शारीरिक, मानसिक, भावनिक या गोष्टी जोडल्या गेल्या. स्वामी रामदेवजी आणि आचार्य बाळकृष्णजी यांनी योगाचा प्रचार आणि प्रसार करताना त्याचा लौकीक जगभर पसरला.

कार्यक्रमाला व्यासपीठावर सन्माननीय अतिथी म्हणून रविंद्र भवनचे उपाध्यक्ष विशांत चिमुलकर, भारत स्वाभिमानचे तालुका अध्यक्ष अनिल वेर्णेकर, सांखळी योग समितीचे प्रभारी संतोष भजे,कार्यक्रमाचे निमंत्रक हनुमंत गांवस, पतंजली समितीचे तालुका अध्यक्ष निलेश गुणाजी,राज्य कार्यकारणीचे खजिनदार शांताराम काणेकर आणि महिला पतंजली समिती तालुका अध्यक्ष स्नेहा देसाई उपस्थित होत्या .

सुरुवातीला मान्यवराच्या हस्ते समई प्रज्वलित करण्यात आली. योग शिक्षक झिलू गांवकर यांनी प्रात्यक्षिकांसह सर्व योग साधकांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे निमंत्रक हनुमंत गांवस यानी उपस्थितांचे स्वागत केले. सुनिल गणपुले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. साखळी प्रभागाचे अध्यक्ष संतोष भजे यांच्याहस्ते प्रमुख पाहुण्यांना फुलांचे रोपटे व भेटवस्तु देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचकलं अनघा गुणाजी यांनी केले तर रायु गोवेंकर यांनी आभार मानले. कार्यक्रम पहाटे ५ .३० वाजता सुरु झाला आणि यात जवळ जवळ २०० योग साधकांनी तशेच सरकारी कर्मचारी वर्गाने उपस्थिती लावली.कार्यक्रमाची सांगता शांतीपाठाने झाली. त्यानंतर आंतरराष्टीय योग दिनानिमित्त पंतजली योग समीती साखळी प्रभागातर्फे योग साधकांनी वेगवेगळ्या ठिकाणी जवळ जवळ ५० योग वर्ग घेतले.

केनरा बैंक Canara Bank — A Govt. of India Undertaking — सिंडिकेट Syndicate

**शाखा कार्यालय : मडगाव (314)**

**मागणी सूचना**

**प्रति,**
**मे. हृषीवेद, पत्ता 1)** फॅक्टरी : प्लॉट क्र. **39** व **40**, फेज–**3**, काकोडा औद्योगिक वसाहत, काकोडा, गोवा**403706**. **मे. हृषीवेद सत्ता 2)** तळमजला, एस–**1**, शालीमार अपार्टमेंट, पाजीफोंड, मडगाव, दक्षिण गोवा, तालुका सालसेत, गोवा **403601**. **श्री. संदिप सुभाष प्रभुदेसाई, (भागीदार/हमीदार)**, ए–**4**, शालीमार अपार्टमेंट, पाजीफोंड, मडगाव, दक्षिण गोवा, तालुका सालसेत, गोवा **403601**. **श्रीमती जानवी संदिप प्रभुदेसाई, (भागीदार/हमीदार)**, ए–**4**, शालीमार अपार्टमेंट, पाजीफोंड, मडगाव, दक्षिण गोवा, तालुका सालसेत, गोवा **403601**. **श्रीमती जानवी संदिप प्रभुदेसाई, संदिप प्रभुदेसाई यांची पत्नी,** निसर्ग, सीडी फ्लोवी व्हॅलीजवळ, मडगाव, दक्षिण गोवा, तालुका सालसेत, गोवा **403601**. **श्रीमती जानवी संदिप प्रभुदेसाई, (भागीदार/हमीदार),** फ्लॅट क्र. ए–**501**, **5** वा मजला, बिल्डींग–ए, कोणकर नेस्ट, आगाळी,फातोर्डा, मडगाव **403602**. **श्रीती सविता एस प्रभुदेसाई (हमीदार)** जी–**5**, शालीमार अपार्टमेंट, पाजीफोंड, मडगाव, दक्षिण गोवा, तालुका सालसेत, गोवा **403601**.

प्रिय महोदय,

**विषय : सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 च्या कलम 13(2) खाली मागणी सूचना**

की, **मे. हृषीवेद, श्री. संदिप सुभाष प्रभुदेसाई, (भागीदार/हमीदार), श्रीमती जानवी संदिप प्रभुदेसाई, (भागीदार/हमीदार), (यानंतर सदर कर्जदार असा उल्लेख)** आणि **श्रीमती सविता एस प्रभुदेसाई (हमीदार)** यांनी आमच्या **मडगाव** खालील कर्जे / क्रेडिट सुविधा घेतलेल्या आहेत.

| कर्जाचे स्वरुप | कर्ज रक्कम | 11.06.2025 रोजी दायित्व | व्याज दर |
|---|---|---|---|
| कृषी मुदत कर्ज – फूड अँड अॅग्रो प्रोसेसिंग | 1,89,00,000.00 | 1,42,78,583.66 (दायित्व) + 2,67,839.42 (व्याज) = 1,45,46,423.08 | 9.95 +2 = 11.95 % |
| कृषी मुदत कर्ज – फूड अँड अॅग्रो प्रोसेसिंग | 11,00,000.00 | 758813.99 (दायित्व) + 28,093.85 (व्याज) =7,86,907.84 | 10.40 +2 = 12.40 % |
| एएलओसीसी | 60,00,000.00 | 6000000 (दायित्व) + 1,11,919 (व्याज) = 61,11,919.00 | 8.95 +2 = 10.95 % |

वरील सदर कर्ज /क्रेडिट सुविधा येथे खाली वर्णिलेल्या अनुसूचीत अधिक विस्ताराने दिलेल्या मालमत्तांच्या गहाणवटीद्वारे सुरक्षित केल्या आहेत ज्या नुसार आमच्या नावे संबंधित दस्तावेज करारबद्ध केला आहे. बँकेने विरहित केलेल्या अटी व शर्ती नुसार तुमची दायित्वे पार पाडण्यात तुम्ही अपयशी ठरल्याने सदर कर्ज एनपीए म्हणून **22.05.2025** रोजी वर्ग करण्यात आले आहे. म्हणून, सदर कायद्याच्या कलम **13(2)** खाली तुम्हाला याद्वारे नोटीस देण्यात येते की ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत तुम्ही त्यावर साठलेल्या आजमितीसच्या व्याज व इतर खर्चासह **रु. 2,14,45,249.92/ - (रु.दोन कोटी चौदा लाख पंचेचाळीस हजार दोनशे एकोणपन्नास व पैसे ब्याण्णव फक्त)** या दायित्वाची पूर्ती करावी अन्यथा सदर कायद्याच्या कलम **13(4)** खाली कोणत्याही वा सर्व हक्कांचा आम्ही वापर करू.

तसेच पुढे, आमच्या पूर्व संमतीविना कोणत्याही प्रकारे येथील अनुसूचीत वर्णिलेल्या मालमत्तांबाबत व्यवहार करण्यास तुम्हाला निर्बंधित केले जात आहे. हे सदर कायदा आणि किंवा अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली आम्हाला उपलब्ध असलेल्या कोणत्याही अन्य अधिकारांच्या पूर्वग्रहाशिवाय आहे.

सदर सुरक्षित मत्ता पुन्हा मिळवण्यासाठी सरफासी कायद्याच्या कलम **13** मधील उपकलम (**8**) मधील तरतुदींकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. ही मागणी सूचना बँकेच्या नोंदीत उपलब्ध असलेल्या तुमच्या मागील ज्ञात पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात आली आहे.

**ही मागणी सूचना आमच्या 27.05.2025 रोजीच्या पूर्वीच्या मागणी सूचना रद्द करून दिली जात आहे.**

**अनुसूची**

**गहाणवट / हायपोथिकेट केलेल्या मत्तांचे विशिष्ट तपशील येथे खाली दिले आहेत.**

**जंगम मालमत्ता** : **1**. सर्व प्रकारचे स्टॉक्स आरएम/डब्ल्यूआयपी/एफजी/कंझ्युमेबल्स/पॅकिंग मटेरियल्स चे हायपोथिकेशन. **2**. प्लॉट क्र. **39** व **40** काकोडा औद्योगिक वसाहत, फेज–३, काकोडा गाव, केपे, गोवा येथे बसविलेल्या सर्व प्रकारच्या प्लांट व मशीनरीज/इक्विपमेंट्स चे हायपोथिकेशन.

**स्थावर मालमत्ता** : **1**. काकोडा नगरपालिका हद्दीत, कुडचडे, केपे तालुका, दक्षिण गोवा जिल्हा, गोवा राज्य येथील व तालुका महसलूल कार्यालयत नोंदणी नसलेल्या व तसेच भू नोंदणी कार्यालयात नोंद नसलेल्या काकोडा गावाच्या सर्व्हे क्र. **82/5, 82/6, 82/7, 82/8** (सर्व क्षाग) असलेल्या काकोडा औद्योगिक वसाहत, फेज–**3** या नावाच्या मालमत्तेत **1200** चौ.मी. एकूण क्षेत्रफळ असलेल्या व प्लॉट क्र. **39** व **40** या जमिनीचे लीजहोल्ड अधिकार आणि **चतु:सीमा** : **पूर्वेस** : गोवा–आयडीसी अंतर्गत रस्ता, **पश्चिमेस** : प्लॉट क्र. **38**, उत्तरेस : गोवा–आयडीसी अंतर्गत रस्ता, **दक्षिणेस** : प्लॉट क्र. **61**. **सीईआरएसएआय आयडी** : **400063918444.**

२. अदमासे **11,287** चौ.मी. क्षेत्रफळाच्या पीटी शीट क्र. **58** चा चलता क्र. **6** खाली स्वतंत्रपणे सर्वेक्षित **3/4** भागाच्या महसूल मात्रिज क्र. **871** व **860** असलेली, खंड **112** (नवीन) च्या क्र. **43272** खाली सालसेत तालुक्याच्या भूनोंदणी कार्यालयत पूर्वी वर्णिलेली, नोंदणी उपजिल्हा सालसेत व तालुका सालसेत मधील मडगाव येथील पीटी शीट क्र. **58** चा चलता क्र. **28** खाली सध्या सर्वेक्षित आणि **11,287** चौ.मी .क्षेत्रफळाच्या मडगाव शहर सर्वेक्षणाच्या पीटी शीट क्र. **58** चा चलता क्र. **6** खाली मूळ सर्वेक्षित आगाळी या नावाच्या मालमत्तेत **3000** चौ.मी. क्षेत्रफळाचा दक्षिण पश्चिम भाग असलेल्या जमिनीचा वेगळा व स्वतंत्र तुकडामध्ये बांधलेल्या व मडगाव नगरपालिकेद्वारे क्र. **2/8731** खाली घरपट्टीसाठी मुल्यांकित केलेल्या **195.47** चौ.मी .सुपर बिल्ट अप क्षेत्रफळाच्या (ज्यात जिना, लिफ्ट्स, पार्क्स इ. सामाईक भागांचा समावेश आहे) बिल्डींग ए च्या पाचव्या मजल्यावरील पेंटहाऊस क्र. ए–**501** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोणकर नेस्ट मधील सर्व भाग आणि **चतु:सीमा** : **पूर्वेस** : याच कॉप्लेक्सची खुली / बगीचाची जागा, **पश्चिमेस** : फ्लॅट क्र. ए–**102**, **उत्तरेस** : पॅसेज व लिफ्ट, **दक्षिणेस** : याच कॉप्लेक्सची खुली / बगीचाची **जागासीईआरएसएआय आयडी** : **400075514839.**

**दिनांक** : **16.06.2025**
**ठिकाण** : **मडगाव**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**कॅनरा बँक**

**CHANGE OF NAME**
I ***SHARMIN BANU SAYYED***, resident of H NO 50, Zoriwaddo, Davorlim, South Goa has changed my name from ***SHARMIN BANU SAYED*** alias ***SHARMIL BANU SAIYED*** alias ***SHARMIN BANU*** Hereafter in all my dealings and documents, I will be known by the name ***SHARMIN BANU SAYYED***

**PUBLIC NOTICE**
By this notice it is brought to the notice of the General Public, Department, Institute, Authorities, Bodies, Banks etc. that MRS. LEANORA PEREIRA alias LEONORA PEREIRA MADEIRA, R/o resident of H. no. 114, Gaunsawaddo, Siolim, Bardez, Goa 403517 has cancelled/ terminated General Power Of Attorney dated 3rd February 2011 executed and registered before Adv Y. ZUZART, office at Mapusa under No. 1007/2011 dated 03/02/2011, appointing Attorney namely; **MR. JOSEPH ALEXANDER MADEIRA alias MR. ALEXMADEIRA**, son of Mr. C. X. Madeira, r/o House no. 114, Gaunsawaddo, Siolim, Bardez, Goa, North Goa 403517.
If anyone has or willing to enter into any contract / agreement of whatsoever in nature, than the executor that i.e. MRS. LEANORA PEREIRA alias LEONORA PEREIRA MADEIRA do not binds her nor liable for the acts or any loss of whatsoever in nature suffered by the parties.
Mapusa, Dated: 21.06.2025
Sd/- **LEANORA PEREIRA alias LEONORA PEREIRA MADEIRA**